दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र |मंगळवार, 17 मार्च 2026| |अंक क्र. 297|वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

''आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल''

हॉटेल बालाजी

ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.

# अंबाजोगाईत महिला क्रिकेटची मुहूर्तमेढ माही परमार यांनी रोवली - डॉ.राजेश इंगोले

## जागतिक महिला दिनानिमित्त क्रिकेट प्रशिक्षक माही परमार यांचा सन्मान

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून क्रिकेट क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या क्रिकेट प्रशिक्षिका तसेच क्रीडा पत्रकार माही परमार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रात महिलांनी केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि समाजात त्यांना अधिक प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमी ही संस्था स्थानिक पातळीवर क्रिकेटला चालना देण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असते. ग्रामीण आणि शहरातील युवा खेळाडूंना संधी उपलब्ध करून देणे, त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देणे तसेच क्रीडा क्षेत्रात नवे खेळाडू घडवणे हा अकॅडमीचा मुख्य उद्देश आहे. याच पार्श्वभूमीवर दरवर्षी सातत्याने विविध क्रिकेट स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धेदरम्यान विविध सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत अनेक प्रेरणादायी सामाजिक उपक्रम देखील राबवण्यात येत आहेत. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने क्रीडा क्षेत्रात महिलांचे योगदान अधोरेखित करण्याच्या उद्देशाने क्रिकेट प्रशिक्षिका तथा क्रीडा पत्रकार माही परमार यांचा अंबाजोगाईतील क्रिकेट मधील अमूल्य योगदाणाबद्दल  मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. . या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.राजेश इंगोले म्हणाले की, माही परमार यांना मी खूप जवळून ओळखतो.

माही परमार या क्रिकेट क्षेत्रात अनेक वर्षांपासून सक्रिय असून महिला क्रिकेटच्या विकासासाठी त्या सातत्याने कार्य करत आहेत. त्या एक कुशल क्रिकेट प्रशिक्षिका म्हणून अनेक तरुण खेळाडूंना प्रशिक्षण देत आहेत. त्याचबरोबर त्या क्रीडा पत्रकारितेतही उल्लेखनीय काम करत असून महाराष्ट्र स्पोर्ट्स या न्यूज चॅनेलच्या संपादक म्हणून कार्यरत आहेत. तसेच स्पोर्ट्स प्लस या दैनिकामध्ये महाराष्ट्र महिला क्रिकेट प्रतिनिधी प्रमुख म्हणून त्या जबाबदारी पार पाडत आहेत. महिला क्रिकेटला योग्य व्यासपीठ मिळावे, महिला खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्याला व्यापक प्रसिद्धी मिळावी यासाठी माही परमार सातत्याने प्रयत्न करत असतात. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये जाऊन त्या महिला क्रिकेटच्या विकासासाठी मार्गदर्शन करत आहेत. अनेक नवोदित महिला खेळाडूंना त्यांनी प्रेरणा दिली असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक खेळाडूंना पुढे जाण्याची संधी मिळत आहे. महाराष्ट्रभर महिला क्रिकेटच्या प्रसारासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय मानले जाते. क्रिकेट प्रशिक्षिका, क्रीडा पत्रकार आणि क्रीडा क्षेत्रातील कार्यकर्त्या या तिन्ही भूमिकांमध्ये त्यांनी सातत्याने काम करत महिला क्रिकेटला बळकटी देण्याचे काम केले आहे. त्यामुळेच त्यांच्या या कार्याची दखल घेत अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला

त्या अत्यंत मेहनतीने आणि जिद्दीने क्रिकेट क्षेत्रात काम करत आहेत. महिला क्रिकेटच्या उभारणीसाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. महाराष्ट्रभर महिला क्रिकेटमध्ये त्यांचे नांव आदराने घेतले जाते. त्यांनी अनेक महिला खेळाडूंना प्रेरणा दिली आहे. भविष्यात अंबाजोगाईसारख्या शहरालाही त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा निश्चितच मोठा फायदा होईल. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने माही परमार यांना मिळालेला हा सन्मान हा त्यांच्या कार्याचा उचित बहुमान असल्याचे सांगत हा पुरस्कार त्यांना भविष्यातही अशाच प्रकारचे क्रीडा कार्य करण्याची प्रेरणा देईल अशी अपेक्षा डॉ.इंगोले यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही माही परमार यांच्या कार्याचे कौतुक केले. महिला क्रिकेटच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे सर्वांनी अभिनंदन केले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सन्मान सोहळ्यावेळी राजकिशोर मोदी, निलेश मुथा,पोलीस निरीक्षक शरद जोगदंड , प्रेमलता मूथा, अनितोष कातकडे, अविनाश साठे, साहेबा लोंढे, जयकुमार लोढा, सतीश बालुतकर, डॉ.संदीप जैन, अक्षय परदेशी, अभिजित जोधळे, प्रतीक बोथरा, ऋषभ रांका आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने क्रीडाप्रेमी, खेळाडू आणि नागरिक उपस्थित होते.  अंबाजोगाई क्रिकेट अकॅडमीच्या या उपक्रमामुळे स्थानिक पातळीवर क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असून भविष्यातही अकॅडेमीने क्रीडा स्पर्धा आणि सन्मान सोहळे आयोजित करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहित परमार,सूत्रसंचलन अशोक तापडिया तर आभार प्रदर्शन निलेश मुथा यांनी केले.




# परळीच्या लेकीचा कलाविष्कार पाहून पुणेकर रसिक भारावले : मैथिली लोंढे यांना पुण्यात 'ललना कलारत्न पुरस्कार' प्रदान

**परळी वैजनाथ/ प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पुण्याच्या निवेदिता प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दिमाखदार सोहळ्यात परळीची युवा कलाकार मैथिली बाळकृष्ण लोंढे हिला मानाचा 'ललना कलारत्न पुरस्कार २०२६' देऊन गौरविण्यात आले. पुण्यातील प्रसिद्ध बालगंधर्व रंगमंदिर येथे महिला कलाकारांसाठी आयोजित या विशेष कार्यक्रमात मैथिलीच्या कलागुणांचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते मैथिलीने स्टेजवर सादर केलेले थेट चित्रकला प्रात्यक्षिक अत्यंत कमी वेळात तिने हिंदी चित्रपटसृष्टीतील सौंदर्याची खाण 'मधुबाला' यांचे हुबेहूब चित्र कॅनव्हासवर साकारले. परळीच्या या लेकीचा कलाविष्कार पाहून उपस्थित पुणेकर रसिक आणि मान्यवर भारावून गेले. टाळ्यांच्या कडकडाटात तिला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराला उत्तर देताना मैथिली म्हणाली की, "निवेदिता प्रतिष्ठानसारख्या संस्थेकडून कलेची पोचपावती मिळणे ही माझ्यासाठी आणि माझ्या परळी शहरासाठी अभिमानाची बाब आहे." या यशामुळे मैथिलीवर परळी वैजनाथ व परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.







# “ओम साईराम... ओम साईराम...” जयघोषात चांदापूर परिसरात प्रति शिर्डी श्री साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

**प्रभू श्री. वैद्यनाथाच्या पावन नगरीत साईभक्तांचा महासागर ; गित्ते परिवाराच्या पुढाकारातून उभारलेले प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिराचा प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा उत्साहात; श्री साईबाबा मंदिर येथे भाविकांनी घेतले मनोभावे दर्शन**

## मंत्री ना.संजय सिरसाट, मंत्री ना. उदय सामंत, आ.धनंजय मुंडे व प्रा. टी. पी. मुंडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थितीती

**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी):**

श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या श्री साईबाबांच्या पावन स्मरणात परळी वैद्यनाथ शहरापासून बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या पावन नगरीपासून काही अंतरावर निसर्गाचे वरदान लाभलेल्या परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे चांदापूर परिसरात आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर जवळ गित्ते परिवाराच्या वतीने भव्य दिव्य श्री साईबाबा मंदिर साकारण्यात आले आहे. उभारण्यात आलेल्या प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिरातील मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा रविवारी (दि.१५ मार्च) अत्यंत भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. “ओम साईराम... ओम साईराम...” या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी या पवित्र सोहळ्यास उपस्थित राहून साईबाबांच्या दर्शनाचा लाभ घेतला. तसेच स्व. केशवराव बाबाजी गित्ते यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.

या सोहळ्याचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमास माजी कृषिमंत्री आमदार धनंजय मुंडे, माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, शिवसेना संपर्क प्रमुख प्रा. टी. पी. मुंडे, दिनेश कारागल, सचिन मुळूक, बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी, बन्सीआणा सिरसाट, प्रा.विजय मुंडे,माजी सभापती गोविंद फड, प्रदीप उर्फ बबलू मुंडे, नाथराव कराड, राजाभाऊ पौळ, मोहन आघाव, भगवान सानप, बाप्पासाहेब घुगे तसेच परळी वैजनाथ नगर परिषदेच्या पाणीपुरवठा सभापती जयश्री रवींद्र (पप्पा) गिते-मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी स्व. केशवराव बाबाजी गिते यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण मंत्री ना. संजय सिरसाट व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक कार्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. यानिमित्त ह.भ.प. ज्ञानेश्वरभक्त अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे प्रभावी कीर्तन झाले. कीर्तनामुळे उपस्थित भाविकांचे वातावरण भक्तीमय झाले. त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

चांदापूर परिसरात आरोग्य भवानी – डोंगरतुकाई मंदिर जवळ गित्ते परिवाराच्या पुढाकारातून साकारण्यात आलेले हे भव्य श्री साईबाबा मंदिर परिसरातील भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचे नवे केंद्र ठरणार आहे. मंदिरासाठी जयपूर येथील सुप्रसिद्ध मूर्तीकारांकडून साकारण्यात आलेली संगमरवरी, मनमोहक आणि आकर्षक प्रति शिर्डी श्री साईबाबांची मूर्ती भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. या पवित्र सोहळ्यामुळे चांदापूर परिसराला एक नवे धार्मिक आणि आध्यात्मिक केंद्र लाभले असून साईभक्तांसाठी हे मंदिर श्रद्धास्थान ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रामराव केशवराव गिते, रवींद्र (पप्पा) केशवराव गिते, भरत केशवराव गिते तसेच ह.भ.प. गुरुवर्य श्री. प्रभाकर (नाना) महाराज झोलकर यांनी विशेष परिश्रम घेतले.










परिवाराने केलेले हे कार्य अत्यंत







### गित्ते परिवार यांनी श्री साईबाबाच्या आशीर्वादाने उभारलेले प्रति शिर्डी श्री साईमंदिर –भक्तांसाठी नवे श्रद्धास्थान-ना. संजय सिरसाट

स्व. केशवराव बाबाजी गित्ते – पुण्यतिथीनिमित्त अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण भव्य साईबाबा मंदिर उभारण्यात आले आहे. मंदिराची प्राणप्रतिष्ठा भक्तिमय वातावरणात पार पडली, ज्यामुळे भाविकांना “श्रद्धा आणि सबुरी”चा संदेश मिळेल. शिर्डीला जाऊ शकत नसलेल्या भाविकांसाठी देखील येथे दर्शन मिळणार आहे. तसेच स्व. केशवराव बाबाजी गित्ते यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. स्व. गित्ते यांच्या कार्याची आणि समाजाप्रती असलेल्या निष्ठेची आठवण जतन करण्यासाठी हा पुतळा उभारला गेला, जो पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. असल्याचे मनोगत महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना.संजय सिरसाट यांनी व्यक्त केले.

श्री साईबाबाच्या कृपेने उभारले प्रति शिर्डी श्री साईमंदिर भक्तांसाठी नवीन आध्यात्मिक केंद्र व स्व. केशवराव गित्ते यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन-उद्योगमंत्री ना.उदय सामंत

श्री साईबाबांच्या आशीर्वादाने चांदापूर येथे उभारलेले भव्य दिव्य प्रति शिर्डी श्री साईमंदिर व स्व. केशवराव गित्ते यांच्या पुण्यतिथी निमित्त पुतळ्याचे अनावर सोहळा पार पडला आहे. रवींद्र पापा गित्ते व गित्ते कुटुंबीयांनी श्रद्धेने केलेले हे कार्य भविष्यात परिसरातील भक्तांसाठी प्रेरणास्थान ठरेल. श्री साईबाबांच्या कृपेने हे मंदिर प्रत्येक भाविकाच्या मनातील श्रद्धा आणि सबुरीचा संदेश घेऊन येईल, तसेच सर्वांचे मनोकामना ध्येय पूर्ण होवो, अशी प्रार्थना त्यांनी केली. या मंदिरामुळे परिसरातील भक्तांना श्री साईबाबांचे दर्शन घेता येईल आणि संपूर्ण परिसर आध्यात्मिक उन्नतीचा अनुभव घेईल, असा विश्वास राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी ऑनलाईन मनोगत व्यक्त केले.

### श्री साईबाबा मंदिर हे पंचक्रोशीतील भाविकांसाठी मोठे श्रद्धास्थान ठरणार-आ. धनंजय मुंडे

प्रभू वैद्यनाथाच्या पावन नगरीत शहरापासून काही अंतरावर परळी तालुक्यातील चांदापुर परिसरात उद्योजक रविंद्र उर्फ पापा गित्ते आणि परळी नगर परिषदेच्या पाणीपुरवठा सभापती सौ.जयश्री रविंद्र गित्ते यांच्या परम श्रद्धेतून गित्ते परिवाराच्या योगदानातून आरोग्य भवानी श्री डोंगरतुकाई मंदिर जवळ उभारण्यात आलेले भव्य दिव्य प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिर व स्व. केशवराव बाबाजी गित्ते यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण पार पडले. गित्ते परिवाराचे योगदान व समाजसेवेची निष्ठा अत्यंत प्रेरणादायी आहे. भक्तांसाठी हे श्री साईबाबा मंदिर एक पवित्र आध्यात्मिक स्थळ ठरेल, तसेच श्री साईबाबांच्या चरणी प्रार्थनेतून सर्वांना आशीर्वाद लाभो हीच साईबाबा चरणी प्रार्थना आ. धनंजय मुंडे यांनी श्री साई बाबांच्या आरती व मनोभावे दर्शन घेतले. कै. केशवराव बाबाजी गित्ते यांनी समाजकार्यात दिलेले योगदान अत्यंत प्रेरणादायी असून त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन केले. प्रति शिर्डी म्हणून ओळखले जाणारे भव्य श्री साईबाबा मंदिर हे पंचक्रोशीतील भाविकांसाठी मोठे श्रद्धास्थान ठरणार असल्याची त्यांनी सांगितले.गित्ते परिवाराने केलेले हे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे.

### श्री साईमंदिर भाविकांसाठी श्रद्धा-सबुरीचा संदेश देणारे प्रेरणास्थान- मा.खा. भागवत कराड

प्रभू वैद्यनाथाच्या पावन नगरीत उभारण्यात आलेले प्रति शिर्डी सद्गुरु श्री साईबाबा यांचे मंदिर हे भाविकांसाठी मोठे श्रद्धास्थान ठरणार आहे. स्व.केशवराव बाबाजी गित्ते यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण तसेच श्री साईबाबा मंदिराचे लोकार्पण होत असल्याचा आनंद असल्याचे त्यांनी नमूद केले. रवींद्र (पापा) गित्ते व गित्ते कुटुंबियांनी श्रद्धा व भक्तीभावातून उभारलेले हे मंदिर साईबाबांनी दिलेल्या ‘श्रद्धा आणि सबुरी’ या संदेशाचे प्रतीक असून या माध्यमातून परिसरातील भाविकांना आध्यात्मिक प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सद्गुरु श्री साईबाबांच्या कृपेने सर्व भाविकांना आशीर्वाद लाभत राहो, अशी प्रार्थनाही मा.खा.भागवत कराड (मा. राज्यमंत्री,अर्थ मंत्रालय, भारत सरकार) यांनी केली.

### गित्ते परिवार यांनी उभारलेले प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिर भाविकांसाठी श्रद्धास्थान- प्रा. टी.पी.मुंडे

परळी शहरापासून काही अंतरावर चांदापूर परिसरात उभारण्यात आलेले प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिर हे परिसरातील भाविकांसाठी मोठे श्रद्धास्थान ठरणार आहे. प्रत्येकाला शिर्डी साईबाबा मंदिर येथे जाता येत नाही, त्यामुळे या ठिकाणी ‘प्रति शिर्डी’ स्वरूपात साईमंदिर उभारण्याचा संकल्प करण्यात आला. या मंदिरामुळे सर्व भाविकांना साईबाबांचे दर्शन सहज मिळणार असून परिसराच्या विकासासाठी येथे भविष्यात भव्य मंगल कार्यालय उभारावे अशी विनंती मनोगत प्रा. टी. पी. मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

### स्व.केशवराव बाबाजी गित्ते पुण्यतिथी – ह. भ. प. ज्ञानेश्वरभक्त अर्जुन महाराज लाड गुरुजींच्या कीर्तन संपन्न

“स्व. केशवराव बाबाजी गित्ते यांच्या तृतीय पुण्यतिथी निमित्त आयोजित भक्तिमय कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला. ह. भ. प. ज्ञानेश्वरभक्त अर्जुन महाराज लाड गुरुजींच्या दुपारी २ ते ४ वाजता पार पडलेल्या कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने उजळून निघाला. अभंगांच्या स्वरांतून श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक ऊर्जा अनुभवायला मिळाली. भक्तांनी साईबाबा चरणी प्रार्थना करून आशीर्वाद लाभला आणि पुन्हा या पावन ठिकाणी येण्याची इच्छा व्यक्त केली. या कार्यक्रमामुळे श्रद्धेचे संदेश पसरले आणि भक्तांसाठी एक नवे आध्यात्मिक प्रेरणास्थान तयार झाले.” स्व.केशवराव बाबाजी गिते यांच्या तृतीय पुण्यतिथी निमित्ताने ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वरभक्त अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे २ ते ४ या वेळेत कीर्तन पार पडले. यावेळी पंच क्रोशीतील नागरिक व भाविक भक्त तसेच राजकीय,नगरसेवक, सभापती, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

### श्री. साईबाबांच्या आशीर्वादाने रवींद्र (पापा ) गित्ते यांनी उभारले भव्य दिव्य मंदिर – भक्तांसाठी प्रतिशिर्डी श्री साईबाबा मंदिर आध्यात्मिक प्रेरणास्थान ठरले

स्व. केशवराव बाबाजी गित्ते यांचा अर्धाकृती पुतळा अनावरण – श्रद्धा, भक्ती आणि कृतज्ञतेने उजळलेला स्मरणोत्सव, भक्तांसाठी प्रेरणास्थान “मी गेल्या २१ वर्षांपासून सेवा करत आलो आहे आणि सदैव श्री साईबाबाच्या चरणी प्रार्थना केली की, एका छोटेसे मंदिर उभारावे. २०२४ मध्ये गुरुपौर्णिमेला प्रा. टी. पी. मुंडे सरांच्या हस्ते पायाभरनी बांधकामास सुरुवात करून या स्वप्नाला प्रारंभ केला. आमच्या कुटुंबाचा पाठिंबा आणि साईबाबांचे आशीर्वाद मिळाले. गित्ते परिवाराची पिढ्यांपासून चालणारी धार्मिक परंपरा आम्ही पुढे नेत आहोत आणि आजही आमची पिढी धार्मिक तसेच भक्तिपूर्ण कार्यात सक्रिय आहे. आम्ही विधीवत पूजा केली, मंत्रोच्चार आणि प्रतिशिर्डी श्री साईबाबा मंदिर उभारण्यासाठी संकल्प केला. माझ्या मोठ्या बंधू रामराव गित्ते यांच्या मार्गदर्शनाने शिर्डीवरुन छोटी साईबाबाची मूर्ती आणली आणि दर गुरुवारी पुजन करत अखंडित सेवा केली. १५ मार्च २०२६ रोजी भव्य दिव्य १ एकर परिसरात प्रति शिर्डी श्री साई बाबा मंदिर भक्तांसाठी खुले झाले. तसेच माझे वडील स्व. केशवराव बाबाजी गित्ते यांच्या ३ ऱ्या पुण्यातिथी अर्धाकृती पुतळा अनावरणही पार पडले.तसेच मी व गित्ते परिवार आम्हाला साईबाबा यांनी मंदिर बांधण्याची कल्पना सुचविली त्यामुळे गित्ते परिवार भाग्यवान आहेत. त्यांनी परळी वैद्यनाथ नगरीत श्री साईबाबांच्या पावन मूर्तीचे “ओम साईराम... ओम साईराम...” भव्य दिव्य प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिर म्हणून ओळखळल्या जाणाऱ्या श्री साईबाबा मंदिर साकारण्यात आले आहे. साईबाबांच्या आशीर्वादामुळे मला जनसेवेची प्रेरणा आणि ऊर्जा मिळाली आहे. माझ्या हृदयातून प्रार्थना आहे की, या मंदिरातून भक्तांना सदैव श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक ऊर्जा लाभो.” अशी प्रतिक्रिया युवा उद्योजक रविंद्र उर्फ पापा गित्ते यांनी दिली. चार भावांच्या प्रेमामुळे व भक्तांच्या सहकार्यामुळे प्रति शिर्डी श्री साईबाबा मंदिर साकारले– श्री साईबाबांच्या चरणी प्रार्थना आणि आशीर्वादाचा अनुभव-ह. भ. प. प्रभाकर नाना झोलकर महाराज श्री “साईबाबांच्या आशीर्वादाने प्रति शिर्डी भव्य दिव्य श्री साई बाबा मंदिर उभे राहिले, हे अनुभव अगदी अद्भुत आहे. रवींद्र पापा, जयाताई आणि स्व.केशवराव दादांच्या आशीर्वादाने तसेच रामराव व भरत यांच्या मार्गदर्शनाने हा भक्तिमय सोहळा यशस्वी झाला. चार भावांचे प्रेम आणि सहकार्य, भक्तांचा उत्साह यामुळे हा कार्यक्रम अत्यंत स्मरणीय ठरला. साईबाबाच्या चरणी प्रार्थनेतून सर्वांना आशीर्वाद लाभो, अशी प्रार्थना ह.भ.प. गुरुवर्य श्री. प्रभाकर (नाना) महाराज झोलकर यांनी केली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# जागतिक महिला दिनानिमित्त बीडमध्ये भव्य डान्स स्पर्धा उत्साहात संपन्न

## "नारी शक्ती तुमच्या कर्तृत्वाला सलाम" या ब्रीदवाक्याखाली महिलांच्या कलेला व कर्तृत्वाला सलाम : वर्षाताई जगदाळे

**बीड | प्रतिनिधी**





जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून "नारी शक्ती तुमच्या कर्तृत्वाला सलाम" या प्रेरणादायी ब्रीदवाक्याखाली म्हाळसा महिला प्रतिष्ठान आयोजित आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संकल्पनेतून बीड येथे भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या वतीने हा कार्यक्रम हॉटेल ओलिओ येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात शहरासह जिल्ह्यातील अनेक महिला व मुलींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या स्पर्धेमध्ये दोन गट करण्यात आले होते. पहिला गट १० ते १७ वयोगटातील मुलींसाठी तर दुसरा गट १८ वर्षे व त्यापुढील महिलांसाठी ठेवण्यात आला होता. दोन्ही गटांमध्ये मोठ्या संख्येने महिला व मुलींनी सहभाग नोंदवून आपल्या नृत्यकलेचे उत्कृष्ट सादरीकरण केले. स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली होती. लहान गटासाठी प्रथम पारितोषिक ७,००० रुपये, द्वितीय ५,००० रुपये आणि तृतीय ३,००० रुपये असे ठेवण्यात आले होते. तर मोठ्या गटासाठीही प्रथम ७,००० रुपये, द्वितीय ५,००० रुपये आणि तृतीय ३,००० रुपये अशी रोख पारितोषिके देण्यात आली. याशिवाय मोठ्या गटातील उत्तेजनार्थ विजेत्यांसाठी तीन पैठणी साड्यांचे विशेष बक्षीस ठेवण्यात आले होते.

या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. मनसेचे नेते दिलीप बापू धोत्रे, वक्फ बोर्ड अध्यक्ष समीर काझी, मनसेचे सरचिटणीस संतोष भाऊ नागरगोजे, मनसेच्या महिला सरचिटणीस रिटा ताई गुप्ता, बीडच्या डीवायएसपी पूजा पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रिया पाटील तसेच मनसेचे बीड जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून स्पर्धकांचे कौतुक केले आणि महिलांच्या कर्तृत्वाला सलाम केला.

स्पर्धेचे परीक्षक व पर्यवेक्षक म्हणून के.एस.के. कॉलेजच्या प्राध्यापिका दुष्यंता रामटेके मॅडम, दै. सिटीजनचे संपादक देवेंद्र ढाका, दै.बीड प्रसारचे संपादक समीर काझी तसेच दै.पार्श्वभूमीचे पत्रकार आनंद वीर यांनी काम पाहिले.

स्पर्धेत सहभागी झालेल्या महिला व मुलींनी आपल्या नृत्यकौशल्याने प्रेक्षकांची मने जिंकली. १० ते १७ वयोगटातील स्पर्धेत प्रथम क्रमांक अद्विता कांबळे हिने पटकावला. द्वितीय क्रमांक विभागून अन्वी सोनवणे व अनुष्का मस्के यांना देण्यात आला, तर तृतीय क्रमांक विभागून अक्षरा मोठे आणि काव्य डोंगरे यांना देण्यात आला.

१८ वर्षांवरील गटामध्ये अनामिका अहिरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक विभागून डॉ. मंजुश्री दुलारवर आणि अंकिता जाधव यांना देण्यात आला. तर तृतीय क्रमांक विभागून श्वेता अवसरमल आणि पायल वंजारे यांना देण्यात आला.

मोठ्या गटातील उत्तेजनार्थ पुरस्कार म्हणून सोनम धुताळमल, आरती मोरे आणि सारिका पवार यांना पैठणी साड्या प्रदान करण्यात आल्या. तसेच या स्पर्धेत उत्कृष्ट नृत्य सादर करणाऱ्या पूर्वी कांबळे, श्रेया वारे, सई वाघमारे, कोमल तुरुकमारे आणि सोनल कांबळे यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला म्हाळसा महिला प्रतिष्ठानच्या सचिव मयुरी बाबर, मनसेच्या महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुठे, उपाध्यक्ष कल्पना कवठेकर, ॲड. संगीता धसे, निर्भीड पत्रकार संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्ष किरण डोळस, उपाध्यक्ष मोनिका बेद्रे, समाजसेविका किश्किंदाताई पांचाळ यांच्यासह शेकडो महिला व मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महिलांच्या कर्तृत्वाला व नृत्यकलेला व्यासपीठ मिळावे तसेच महिलांमध्ये आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या भव्य डान्स स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला आणि उपस्थितांनी महिला शक्तीच्या कर्तृत्वाला सलाम करत कार्यक्रमाचे कौतुक केले.

## लोकार्थ

### इनोव्हिजन लिमिटेडचा आयपीओ 10 मार्च 2026 रोजी सुरू होणार

इनोव्हिजन लि. ने त्याच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी ₹10 दर्शनी मूल्याच्या प्रति इक्विटी शेअरची किंमत ₹५२१ ते रु. ५४८ प्रति इक्विटी शेअरनिश्चित केली आहे.

कंपनीची इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ किंवा इश्यू) मंगळवार, 10 मार्च 2026 रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवारी, 12 मार्च 2026 रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान 27 इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर 27 इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. या तारखेपर्यंत 10 रुपये दर्शनी मूल्याचे 18,900,000 इक्विटी शेअर्स असून आयपीओ

हा रु. 2,550.00 दशलक्षचा नवीन इश्यू आहे आणि प्रवर्तक विक्री करणाऱ्या भागधारकांद्वारे - लेफ्टनंट कर्नल रणदीप हुंडल आणि उदय पाल सिंग यांनी 1,238,000 समभागांसाठी ऑफर-फर-सेल आहे.ताज्या इश्यूपासून रु. 510.00 दशलक्ष रकमेपर्यंतची रक्कम कंपनीने घेतलेल्या सर्व किंवा काही उधारीच्या अंशतः किंवा पूर्णतः परतफेड किंवा पूर्व-पेमेंटसाठी, कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी निधी देण्यासाठी रु. 1,190.00 दशलक्ष असेल. कंपनी भारतभरातील आपल्या ग्राहकांना मनुष्यबळ सेवा, टोल प्लाझा व्यवस्थापन आणि कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करण्याच्या व्यवसायात आहे.

### शिक्षक सक्षमीकरणासाठी भारती एअरटेल फाउंडेशनचा एआय एकत्रीकरण उपक्रम



भारताच्या शिक्षण परिसंस्थेत AI चा स्वीकार वेगाने वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, भारती एअरटेल फाउंडेशनने जागतिक स्तरावरील ना-नफा संस्थेच्या CK 12 फाउंडेशनसोबत भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत,K12 स्तरावरील सर्व शिक्षकांसाठी 45 पेक्षा अधिक AIसक्षम अध्यापन साधनांचे TheTeacherApp मध्ये एकत्रीकरण करण्यात आले आहे. सध्या देशभरातील 2 लाखांहून अधिक शिक्षक वापरत असलेले TheTeacherApp हे आयुष्यभर मोफत असलेले डिजिटल शिक्षण व्यासपीठ आहे. वर्गखोलीतील प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेले AIसक्षम TheTeacherApp शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापन प्रक्रियेला पाठबळ देत, वेळ वाचवणे, अध्यापन अधिक प्रभावी करणे आणि भारताच्या विकसित होत असलेल्या शिक्षण व्यवस्थेशी सुसंगत, सुरक्षित व संदर्भानुरूप साधनांद्वारे विविध अध्यापन गरजांना प्रतिसाद देणे शक्य करते.राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 आणि विकसित भारत 2047 या दृष्टीकोनावर आधारित ही भागीदारी शिक्षकांसाठी केवळ डिजिटल प्रवेशापासून अर्थपूर्ण डिजिटल सहभागाकडे वाटचाल दर्शवते.TheTeacherApp दीर्घकाळापासून प्रशिक्षण व शिक्षण संसाधनांच्या माध्यमातून शिक्षकांना पाठबळ देत आहे. त्याच्या नव्या AI-सक्षम आवृत्तीत अध्यापन कार्यप्रवाहात थेट सहाय्यक स्तर समाविष्ट करण्यात आला आहे.

### एअरटेलची पेमेंट्स बँक रुपे कार्डसाठी बॅलन्स अपडेट सेवा

एअरटेल पेमेंट्स बँकेने आपल्या एनसीएमसी एनेबल्ड रुपे ऑन-द-गो कार्डांसाठीच्या तत्काळ एनएफसी-बेस्ड बॅलन्स अपडेट सुविधेची घोषणा केली. ग्राहक आता त्यांच्या एनएफसी-पॉवर्ड अँड्रॉइड स्मार्टफोन्सवरील कार्ड सहजपणे टॅप करून तत्काळ कार्डावरील उर्वरित रक्कम तपासू शकतील किंवा ती अद्ययावत करू शकतील. त्यामुळे मेट्रो स्थानकावरील किऑस्कमध्ये जाण्याची गरज भासणार नाही आणि विनासायास, पूर्णपणे डिजिटल व संपर्करहित प्रवासाचा अनुभव मिळेल. वास्तव जगातील वापराची माहिती तसेच ग्राहकांच्या प्रतिक्रिया जमवण्यासाठी एअरटेल पेमेंट्स बँकेने काही महिन्यांपूर्वी ही सुविधा प्रयोग म्हणून सादर केली होती. प्रायोगिक स्तरावर या सुविधेला चांगली स्वीकृती आणि ग्राहकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला, त्यामुळे या सुविधेची दैनंदिन प्रवाशांसाठी असणारी उपयुक्तता सिद्ध झाली. या सकारात्मक प्रतिसादामुळे बँक आता ही सुविधा रुपे ऑन-द-गो कार्डाच्या सर्व वापरकर्त्यांसाठी सुरू करत आहे.

या सुविधेत सुधारणा झाल्यामुळे प्रवासी आता त्यांच्या बँकखात्यामध्ये किंवा एअरटेल थँक्स ॲपवरील वॉलेटमध्ये लॉगइन करून लिंक्ड एनएफसी-एनेबल्ड अँड्रॉइड स्मार्टफोनद्वारे तत्काळ (रिअल टाइम) कार्ड बॅलन्स तपासू शकतात किंवा ते अद्ययावत करू शकतात

### होळीच्या सणाचा आस्वाद देणारे कॅफे अकासाचे उत्सवी पक्वान्न



कॅफे अकासा, अकासा एअरची ऑनबोर्ड मील सर्व्हिस प्रस्तुत करत आहे होळी स्पेशल मीलची चौथी आवृत्ती, जिथे रंगीबेरंगी होळीची मजा आणि स्वादिष्ट फ्लेवर्स मिळतात. भारतभर आवडीने खाल्ल्या जाणाऱ्या पारंपरिक होळीच्या पदार्थांपासून प्रेरित ही खास ऑफर आहे ज्यात स्वादिष्ट क्लब कचोरी सोबत मसालेदार दम आलू, सोबत थंडाई गुजियाची जोड आणि आपल्या पसंतीचा एक बिव्हरेज असा भन्नाट मेन्यू दिला आहे. हे खास मील 1 मार्च ते 31 मार्च 2026 पर्यंत उपलब्ध आहे आणि तुम्ही www.akasaair.com किंवा अकासा एअर मोबाइल ॲप वरून प्री-बुक करू शकता. होळी म्हणजे एकत्र येणं, आनंद आणि सेलिब्रेशनची खरी मजा आणि हाच उत्साह या खास मीलमधून अनुभवायला मिळतो, खारट-चटपटीत आणि गोड अशा फ्लेवर्सचा सुंदर मेळ घालत हा फेस्टिव्ह ट्रीट सणाची खरी चव पकडतो. पारंपरिक होळी फेव्हरेट्समधून प्रेरणा घेत, अकासा एअर ने प्रवास अधिक खास आणि पर्सनल वाटावा यासाठी सीझनल टच दिला आहे, त्यामुळे फ्लाइंगचा अनुभवही सणासुदीसारखाच खास आणि आनंददायी बनतो. कॅफे अकासा चा नेहमी अपडेट होणारा मेन्यू खास विचारपूर्वक तयार केला जातो, ज्यात विविध प्रकारचे गॉरमेट मील्स, चविष्ट स्नॅक्स आणि रिफ्रेशिंग बिव्हरेजेसचा समावेश आहे, ज्यामुळे प्रत्येकाच्या टेस्ट आणि डाएट प्राधान्याला साजेसा पर्याय मिळतो.

**संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे**

## बदलापूर येथील रॉयल रिसॉर्ट येथे भाजपा घाटकोपर पश्चिम विधानसभेच्या तिन्ही मंडळांचा दोन दिवसीय जिल्हा प्रशिक्षण वर्ग संपन्न



**मुंबई, (केतन भोज) ;**भारतीय जनता पार्टी घाटकोपर पश्चिम विधानसभेचे आमदार राम कदम तसेच ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १४ व १५ मार्च रोजी घाटकोपर पश्चिम मधील कार्यकर्त्यांसाठी बदलापूर येथील रॉयल रिसॉर्ट याठिकाणी घाटकोपर पश्चिम विधानसभेच्या तिन्ही मंडळांचा दोन दिवसीय आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाशिबीर वर्ग पार पडला.या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत पक्षाची विचारधारा,संघटनात्मक बळकटी तसेच कार्यकर्त्यांची भूमिका अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने एकूण सात सत्रांचे आयोजन यावेळी यामध्ये करण्यात आले होते.कार्यकर्त्यांना संघटनात्मक बळकटी,संवाद कौशल्य,पक्षाने केलेली कार्य,त्याची उद्दिष्टे आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर याबाबत महत्त्वपूर्ण माहिती यावेळी देण्यात आली. या संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्हा महामंत्री लालजी यादव,चंद्रकांत मालकर,हेमेंद्र शृंगारे यांची विशेष उपस्थिती होती.तसेच या प्रशिक्षण सत्रामध्ये आमदार मिहीर कोटेचा,सौ.अश्विनी कराडे,भालचंद्र शिरसाट,अवधूत वाघ आणि विपीन तिवारी यांनी भारतीय जनता पार्टीचा गौरवशाली इतिहास,पक्षाची कार्यपद्धती आणि मजबूत संघटन उभारणी याबाबत उपस्थित कार्यकर्त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून,पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी सर्व कार्यकर्ते नव्या ऊर्जेसह कार्यरत राहून निश्चितच पुढील काळात पक्ष आणि संघटन बळकट होण्यास यासाठी मदत होईल असा विश्वास यावेळी संतोष गांजले - मंडळ अध्यक्ष पार्कसाईट घाटकोपर पश्चिम विधानसभा यांनी व्यक्त केला.



# जागतिक महिला दिन : समाजाच्या मानसिकतेत बदलाची गरज

जागतिक महिला दिन जवळ आला की समाजात विविध चर्चा सुरू होतात. महिलांचे अधिकार, समानता, सबलीकरण, कुटुंबव्यवस्था, पुरुषांची भूमिका अशा अनेक विषयांवर मतप्रवाह दिसतात. काही ठिकाणी हा दिवस महिलांच्या यशाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो, तर काही ठिकाणी तो समाजातील विसंगतींवर टीका करण्याचा दिवस बनतो. परंतु एक गोष्ट स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे की महिला दिन हा पुरुषांची माप काढण्याचा किंवा केवळ व्यवस्थेला दोष देण्याचा दिवस नाही. त्यामागील उद्देश अधिक व्यापक आणि सकारात्मक आहे.

टीका करायची ठरवली तर समाजातील प्रत्येक घटकावर शंभर मुद्दे काढता येतात. पुरुषांविषयी, महिलांविषयी, कुटुंबव्यवस्थेविषयी किंवा व्यवस्थेविषयी—प्रत्येक ठिकाणी काही ना काही दोष नक्कीच सापडू शकतात. परंतु समाजाची उभारणी केवळ दोष शोधून होत नाही; ती परस्पर समज, सन्मान आणि सहकार्य यांच्या आधारावर घडत असते. त्यामुळे महिला दिनाच्या निमित्ताने जर आपण केवळ दोषारोपांची यादी तयार करत बसलो, तर त्या दिवसाच्या मूळ उद्देशालाच धक्का बसतो.

महिला दिनाचा मूलभूत विचार हा स्त्री-पुरुष समानतेचा आहे. समानता म्हणजे संघर्ष नव्हे. समानता म्हणजे एकमेकांना कमी लेखणेही नव्हे. समानता म्हणजे परस्पर सन्मान आणि समान संधी. समाजात स्त्री आणि पुरुष हे दोन्ही घटक तितकेच महत्त्वाचे आहेत. एका घटकाला कमी लेखून दुसऱ्याला उंचावण्याचा प्रयत्न केला तर तो समाज टिकाऊ राहत नाही. त्यामुळे महिला दिन हा संघर्षाचा नव्हे, तर सहप्रगतीचा संदेश देणारा दिवस आहे.

जगभरातील परिस्थिती पाहिली तर महिलांच्या स्थितीचे चित्र एकसारखे नाही. काही देशांमध्ये महिलांनी शिक्षण, विज्ञान, उद्योग, प्रशासन आणि राजकारण या क्षेत्रांत मोठी प्रगती साधली आहे. अनेक देशांमध्ये महिलांनी नेतृत्वाच्या भूमिकेतून समाजात सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. तर काही देशांमध्ये अजूनही महिलांना मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. त्यामुळे महिला दिनाचा विचार करताना जागतिक परिस्थितीतील विविधतेची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

भारतातील परिस्थिती पाहिली तर गेल्या काही दशकांत महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने लक्षणीय बदल झाले आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रात मुलींची संख्या वाढली आहे. उद्योग, प्रशासन, क्रीडा, विज्ञान, कला आणि राजकारण या क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण मिळाल्यामुळे नेतृत्वाच्या संधी वाढल्या आहेत. अनेक महिलांनी आपल्या कर्तृत्वाने समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. ही प्रगती समाजातील सकारात्मक बदलांची साक्ष देते.

तथापि, या प्रगतीसोबत काही प्रश्न अजूनही उभे आहेत. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न, कार्यक्षेत्रातील समान संधी, घरातील जबाबदाऱ्यांचे संतुलन, सामाजिक मानसिकतेतील बदल अशा अनेक मुद्द्यांवर अजूनही काम करण्याची गरज आहे. महिला दिनाचा खरा अर्थ म्हणजे या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणे आणि त्यावर सकारात्मक उपाय शोधणे.



**डॉ सुवर्णा कराड**
**(प्रदेशाध्यक्ष वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र राज्य)**

महिला सबलीकरण हा केवळ घोषणांचा विषय नाही. तो शिक्षण, स्वावलंबन, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास यांच्या माध्यमातून साध्य होणारी प्रक्रिया आहे. महिलांना शिक्षण मिळाले, आर्थिक स्वावलंबन मिळाले आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळाला तर समाज अधिक सुदृढ बनतो. त्यामुळे महिला सबलीकरण ही केवळ महिलांची गरज नसून ती समाजाच्या सर्वांगीण विकासाची आवश्यकता आहे.

या संदर्भात पुरुषांची भूमिका देखील महत्त्वाची आहे. स्त्री-पुरुष हे प्रतिस्पर्धी नसून ते समाजाचे सहकारी आहेत. कुटुंबव्यवस्था, सामाजिक रचना आणि आर्थिक व्यवस्था या सर्व गोष्टी स्त्री-पुरुषांच्या सहकार्यावर उभ्या आहेत. त्यामुळे समाजातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी परस्पर संवाद आणि समज आवश्यक आहे. दोषारोपांच्या भाषेतून समाजाचे प्रश्न सुटत नाहीत.

कुटुंब ही समानतेची पहिली शाळा असते. घरामध्ये जर मुलगा आणि मुलगी यांच्यात समानतेचे मूल्य रुजवले गेले, तर पुढील पिढी अधिक संवेदनशील आणि समतोल विचारांची बनते. त्यामुळे महिला सक्षमीकरणाची सुरुवात कुटुंबातूनच व्हायला हवी. मुलींना शिक्षण, संधी आणि प्रोत्साहन देणे जितके आवश्यक आहे, तितकेच मुलांना समानतेचे संस्कार देणेही आवश्यक आहे.

महिला दिन साजरा करताना अनेक कार्यक्रम, चर्चा, परिसंवाद आणि भाषणे आयोजित केली जातात. हे सर्व उपक्रम महत्त्वाचे असले तरी त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे समाजाच्या मानसिकतेत होणारा बदल. समानतेचा विचार केवळ घोषणांमध्ये न राहता तो आचरणात उतरला पाहिजे. स्त्री-पुरुष परस्पर सन्मानाने वागले, तर समाज अधिक सुदृढ आणि प्रगत होऊ शकतो.

महिला दिनाचा खरा संदेश हा संघर्षाचा नाही, तर संतुलनाचा आहे. समाजातील समस्यांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही, पण त्याच वेळी प्रत्येक प्रश्नाला संघर्षाचे रूप देणेही योग्य नाही. संतुलित दृष्टिकोन, परस्पर सन्मान आणि सहकार्य यांच्या माध्यमातूनच समाजात टिकाऊ बदल घडू शकतात.

आजच्या काळात महिला दिनाकडे पाहताना एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. समाज बदलायचा असेल तर स्त्री आणि पुरुष दोघांनीही आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे. समानता ही केवळ एका घटकाची लढाई नसते; ती संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा मार्ग असते. त्यामुळे महिला दिन हा दोषारोपांचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. अखेर समाजाची खरी प्रगती तेव्हाच शक्य होते, जेव्हा स्त्री आणि पुरुष दोघेही एकमेकांच्या सन्मानाचा स्वीकार करतात आणि विकासाच्या प्रवासात एकमेकांचे सहकारी बनतात. महिला दिनाचा खरा अर्थ हाच आहे की समानतेची वाट ही संघर्षातून नव्हे, तर परस्पर विश्वास, सहकार्य आणि सकारात्मक बदलातून तयार होते. अशा दृष्टिकोनातून पाहिल्यास महिला दिन हा केवळ एक दिवस न राहता समाजाच्या प्रगतीचा मार्गदर्शक ठरू शकतो.

# परळीतील भगवान विश्वकर्मा मंदिर : माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केली पूजा व आरती




**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

द्वादश ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ नगरी परळी वैजनाथ येथील भगवान विश्वकर्मा मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा मोठ्या भक्तिभावात व उत्साहात संपन्न होत आहे. या निमित्ताने माजी नगराध्यक्ष नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी उपस्थित राहून भगवान विश्वकर्मा यांची पूजा भ आरती केली.

यावेळी बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी उपस्थित भाविक बांधवांना शुभेच्छा देताना सांगितले की, सृष्टीचे दिव्य शिल्पकार व निर्माणकलेचे अधिष्ठाता भगवान विश्वकर्मा यांच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि प्रगती नांदो, हीच प्रार्थना आहे.मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. धार्मिक विधी, पूजा-अर्चा व आरतीच्या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. भाविकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे संपूर्ण परिसर मंगलमय वातावरणाने भारावून गेला. यावेळी विश्वकर्मा मंदिर च्या वतीने बाजीराव भैया धर्माधिकारी यांचा हृदय सत्कार करण्यात आला.

विश्वकर्मा मंदिरसाठी माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी निधी दिला होता. यातून हे सभागृह निर्माण झाले आहे. त्याचप्रमाणे या मंदिराच्या दुसऱ्या मजल्यासाठीही ना. पंकजाताई मुंडे व आ धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून निधी मंजूर करून देण्यात येईल. लवकरच हा निधी पण या मंदिराला मिळेल अशी ग्वाही बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी यावेळी दिली.








# भीम महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी शिवश्री दिनेश गजमल यांची निवड

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**



भारतरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या भीम महोत्सव उत्सवासाठी शिवाजीनगर थर्मल रोड परिसरातील जयंती उत्सव समितीची बैठक लुंबिनी बुद्ध विहार, शिवाजीनगर येथे उत्साहात पार पडली. या बैठकीत शिवश्री दिनेश गजमल यांची भीम महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

ही बैठक मा. रमेश भाऊ सरवदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडली. १४ एप्रिल हा दिवस संपूर्ण समाजासाठी अभिमानाचा व प्रेरणेचा असल्याचे सांगत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" हा मूलमंत्र आपल्या जीवनात आत्मसात करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समाजापुढे आदर्श ठरावा, या उद्देशाने सर्वसमावेशक कार्यकारणीची निवड करण्यात आली. जयंतीनिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून त्यामध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, वृक्षारोपण, देखावे, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप तसेच रक्तदान शिबिर आदी उपक्रमांचा समावेश करण्यात आलाआहे.

कार्यकारणी पुढीलप्रमाणे :अध्यक्ष – दिनेश गजमल, उपाध्यक्ष – सचिन कांबळे, सचिव – हरीश चव्हाण, कोषाध्यक्ष – गणेश दादा मोडाणी, मेघराज पारधे, संरक्षण प्रमुख – कुणाल चाटे, प्रमुख मार्गदर्शक व सल्लागार : भीमराव गुरु डावरे (नगरसेवक), नीलकंठ चाटे (नगरसेवक), लक्ष्मण मुरकुटे (नगरसेवक), किशोर पारधे (मा. नगरसेवक), बालाजी भाऊ चाटे, ॲड. प्रेमनाथ मुंडे, आमोल कानडे, बाळासाहेब बीडगर, गणेश वाकडे, राहुल खोमणे, रामभाऊ ढेंगळे, विष्णू बुरकुले, समाधान बुरकुले, रुपेश गव्हाने, पंकज साळुंखे, बालाजी चव्हाण, आशिष काळबांडे, रवी गवळी, मंथन जगतकर, आकाश पोटभरे, बबलू कांबळे, अजय रोडे, कुलदीप गायकवाड, अशितोष मोरे, आदित्य जाधव, सुमित घागरमले, प्रदीप राठोड, इंद्रजीत रोडे, आकाश कसबे, संघशील डोळस, प्रदीप जगतकर, सुरज गरड तसेच भीमाई महिला मंडळ यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश कदम यांनी केले तर आभार प्रदर्शन युवा नेते प्रल्हाद सुरवसे यांनी केले.

# मतदार यादी पडताळणी प्रक्रियेत संभ्रम; मृत आई-वडील आजी-आजोबा असलेल्या मतदारांचे व्हेरिफिकेशन न झाल्याने नाराजी



**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

तहसील प्रशासनाच्या आदेशानुसार सध्या जिल्ह्यासह अंबाजोगाई तालुक्यात आणि तालुक्यातील ग्रामीण भागात मतदार यादी पडताळणी (व्हेरिफिकेशन) मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे मतदारांची माहिती तपासून नोंदी अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. मात्र व्हेरिफिकेशन प्रक्रियेदरम्यान काही ठिकाणी अडचणी निर्माण होत असल्याने मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पडताळणी करताना ज्या मतदारांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा हयात आहेत, अशा मतदारांचे जुने मतदान ओळखपत्र सहजपणे व्हेरिफिकेशन केले जात असल्याचे सांगितले जात आहे. परंतु ज्या मतदारांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा हयात नाहीत आणि त्यांचे निधन झाले आहे, अशा मतदारांचे व्हेरिफिकेशन होत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

यामुळे अनेक मतदारांना आपल्या नावाची नोंद मतदार यादीत राहील की नाही, याबाबत शंका निर्माण झाली आहे. काही ठिकाणी संबंधित कर्मचाऱ्यांकडून योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम वाढत असल्याचेही सांगितले जात आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व मतदारांचे समान पद्धतीने आणि कोणताही भेदभाव न करता व्हेरिफिकेशन करण्यात यावे, तसेच नियम स्पष्ट करून प्रक्रिया सुलभ करावी, अशी मागणी मतदार बांधवांकडून करण्यात येत आहे. तहसील प्रशासनाने याबाबत स्पष्ट सूचना देऊन नागरिकांचा संभ्रम दूर करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अचार्य टाकळीच्या पोलिस पाटीलपदी सौ.रोहिणी ज्ञानेश्वर गांगार्डे यांची निवड!



**सिरसाळा/अतुल बडे**

परळी तालुक्यातील अचार्य टाकळी येथील रिक्त असलेल्या पोलिस पाटील पदासाठी नुकतीच निवड प्रक्रिया पार पडली असून, यामध्ये रोहिणी ज्ञानेश्वर गंगार्डे यांची पोलिस पाटील म्हणून निवड करण्यात आली आहे.

सविस्तर माहीती अशी की,अचार्य टाकळी येथील पोलिस पाटील पद गेल्या काही काळापासून रिक्त होते. या पदासाठी प्रशासनाकडून कायदेशीर प्रक्रिया राबवण्यात आली होती. यामध्ये रोहिणी ज्ञानेश्वर गंगार्डे यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर यश संपादन केले. त्यांच्या निवडीचे अधिकृत पत्र प्रशासनाकडून प्राप्त झाले असून, त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. रोहिणी गंगार्डे यांची निवड झाल्याबद्दल अचार्य टाकळी सह सिरसाळा परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे. एका सुशिक्षित महिलेची या पदावर निवड झाल्यामुळे गावातील शांतता व सुव्यवस्था राखण्यास मदत होईल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

"गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि ग्रामस्थ व पोलीस प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून मी प्रामाणिकपणे काम करेन," अशी प्रतिक्रिया रोहिणी गंगार्डे यांनी निवडीनंतर दिली. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# माजी आ.बाळासाहेब आजबे यांच्या वतीने आष्टीत इफ्तार पार्टी संपन्न





**आष्टी (प्रतिनिधी)**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या वतीने पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून आष्टी येथे मुस्लिम बांधवांसाठी सोमवार दिनांक 16 मार्च रोजी सायंकाळी 6:44 वाजता इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते .

माजी आ. बाळासाहेब आजबे यांच्या वतीने आयोजित इतर पार्टीच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, सर्वधर्मसमभाव, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला.

आष्टी–पाटोदा–शिरूरमतदारसंघात हिंदू मुस्लिम ऐक्य व बंधू भावाचा संदेश देण्यासाठी माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यावतीने इफ्तार पार्टीचे दरवर्षी आयोजन करण्यात येते या पार्टीसाठी सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहतात व मोठ्या उत्साहामध्ये एकत्र येत इफ्तार पार्टीचा आनंद घेतात.

रमजान महिन्यात मुस्लिम बांधव दिवसभर कडक उपवास (रोजा) पाळतात आणि सूर्यास्ताच्या वेळी रोजा सोडण्याच्या प्रक्रियेला 'इफ्तार' असे म्हटले जाते. या इफ्तारच्या निमित्ताने विविध धर्म व समाजातील नागरिक एकत्र येऊन स्नेहभोजन करतात. त्यामुळे समाजात बंधुभाव, सलोखा आणि एकोपा वाढीस लागतो.

या प्रसंगी आष्टी शहरासह पंचक्रोशीतील विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय नेते, डॉक्टर वकील समाजसेवक, व्यापारी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.